# अभय ..........नावाप्रमाणे

आपण सगळे रोजच्या नोकरीच्या तणावात  राहत असतो. कित्येकदा वैतागून सगळे सोडून दुसरे, मनाला पटेल-आवडेल असे करायचा विचार डोक्यात येतो. ज्यात मन रमते ते करावेसे वाटते, चार पैसे कमी मिळाले तरी चालेल; घेऊ जमवून इतकी पण मनाची तयारी होते; पण धाडस होत नाही, होते फक्त चर्चा आणि विचार.

आपण सगळे घरकर्ज आणि इतर चक्रात अडकले आहोत. बाहेर पडता येत नाही. धावायचे थांबलो तर...

मागे लागलेले  व्याप पाठीवर येऊन आदळतील; म्हणून रोज धावतच राहतो. सतत धावणे सहन होत नाही; पुन्हा कधीतरी मित्र- मैत्रिणींबरोबर चर्चा "की आता बस झाले; सोडावे सगळे". पण नेमके तेच होत नाही. आपण दुसरा विचार आणि त्याची तयारी करतच नाही. प्रत्येक उद्विग्न अवस्थेत दुसरे काही मिळावे अशी प्रयत्नावीण  नुसती आशा आणि एक बालहट्ट मनातल्या मनात करत राहतो.

मागच्या वर्षी; माझ्या एका मित्राने "अभयने"  हा पराक्रम केला, मोठी हुद्द्याची जागा आणि पगार सोडून हे दिव्य केले; त्या दिवशीचा माझा जसाच्या तसा अनुभव आणि त्यावेळेला त्याच्याबद्दल

काहीबाही खरडलेली ही कविता.

अभय ..........नावाप्रमाणे

रोजच्यासारखा उठलो, उठायची गडबड झाली

आवराआवर केली, बस पकडायची धडपड केली

कामावर आलो, सिस्टम चालू केली

नाश्त्याला चाललो होतो, एवढ्यात फोनवर रिंग आली .

कानावर विश्वास बसेना, तू पेपर टाकला?

स्वत:वर विश्वास ठेवून, स्वत:चा उद्योग चालू केला?
बातमी ऐकून आनंदच झाला, मित्रा तू तर कमालच केली
आम्ही कंपनीला नुसती नावे ठेवतो, तू तर कंपनीचीच काशी केली.

आम्ही रोज असेच वागणार, असेच जगणार
पाच दिवस कंपनीची हमाली, इमाने-इतबारे करणार
पैसे मिळत असून, त्यात सुखी नसणार
दुसरी बरी वाटते म्हणून, आहे तिला नावे ठेवणार

आम्ही रोज, असाच दिवस ढकलणार
संध्याकाळी कंपनीला, शिव्या देत घरी जाणार
रोज शुक्रवार कधी येतो, याची वाट पाहणार
आणि अप्रेजल कधी होते, याकडे डोळे लावणार

अनेक शुक्रवार, येणार जाणार
अप्रेजल पण होणार, मनासारखे काही नाही मिळणार
दिलेले गाजर खात राहणार, झालेला पचका पचवत राहणार
पॉलिसी आणि मॅनेजरला बोलत, स्वीचच्या ताज्या गप्पा मारत  राहणार

एक स्वीच पण होणार, नव्याचे नऊ दिवस जाणार
नवीन शाळेला पण, अशाच शिव्या देणार, आणि पुन्हा त्याच चक्रात अडकणार
हे सगळे दुकान बंद करावे, असे वाटणार, पण धमक नाही होणार
साला, आम्ही नुसताच विचार करणार

सगळ्या मित्रात, तूच हिम्मत दाखवली

आम्ही ज्याचा फक्त विचार करतो, त्याची तू कृती केली

अवघडच वाट तशी, पण ती तू जवळ केली

खरच अभ्या कंपनी सोडून, तू मोठी गोष्ट केली

निर्णय घेतला त्याला, जोड आहे मागच्या २/३ वर्षाची

फालतू गोष्टी सोडून, सोसलेल्या कष्टाची

तुला कदाचित वाटत पण असेल, आपण बरोबर केले का नक्की

पण तू नक्कीच यशस्वी होणार, हि गोष्ट माझ्या मनी आहे पक्की

त्यामुळे, परत नको जुना विचार

आता करायचा आहे, पुढचा कारभार

आम्ही आहेच सदैव, तुझ्या मदतीला तयार

तू फक्त लढ, तुला अडचणी आल्या तर आम्ही आहे; घ्यायला त्यांचा समाचार

खरच अभ्या भावा, कमालच केली

तू तर कंपनीचीच काशी केली

**© सचिन पुरुषोत्तम कुलकर्णी**

**sachin.kulkarni78@gmail.com**

**www.saarthbodh.com**